"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१

ईमेलआयडी : est14-rdd@mah.gov.in क्रमांक : जिपव-२०२२/प्र.क्र.२९(भाग-२)/आस्था-१४

दूरध्वनी क्र ०२२-२२०६७९५ दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०२३.

---

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय:-** जिल्हा परिषद शिक्षक संवर्गाच्या सन २०२२-२३ जिल्हांतर्गत बदल्यांबाबत

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था-१४, दि.०७.०४.२०२१

या विभागाच्या दिनांक ०७.०४.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद शिक्षक संवर्गाच्या जिल्हांतर्गत बदलीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हांतर्गत बदल्या ह्या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्याची कार्यवाही सद्यस्थितीत सुरु असून बदली प्रणालीमध्ये टप्पा क्र.१,२,३, ४ व ५मधील कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

२. "शासन निर्णय दिनांक ०७.०४.२०२१ मधील मुददा क्र.४.७ येथे बदलीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करताना त्यामध्ये कार्यमुक्तीचा दिनांक नमूद करण्यात यावा, असे नमूद आहे. परंतु प्रत्यक्षात कालावधी नमूद करण्यात आलेला नाही. यास्तव, असे स्पष्ट करण्यात येते की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, **जिल्हांतर्गत बदली झालेल्या शिक्षकांना दि.०१.०५.२०२३ ते दि.१५.०५.२०२३ पर्यंत कार्यमुक्तीचे प्रशासकीय आदेश निर्गमित करावेत व कोणत्याही परिस्थितीत दि.१६.०५.२०२३ ते दि.३१.०५.२०२३ या कालावधीत अशा शिक्षकांना प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याबाबतची कार्यवाही करावी.**

(प्रशांत पाटील)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-** १. Vinsys IT Services (I) Pvt. Ltd. Shivaji Niketan, Tejas Society, Kotharud, Pune

२. कार्यासन आस्था-१४ संग्रहार्थ.